महाराष्ट्र सुशासन विधेयकाच्या मसुद्यास अंतिम रूप देण्यासाठी घटित करण्यात आलेला कार्यगट बरखास्त करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांक सुशानि-२२२३/प्र.क्र.२५/रवका-२.**

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- १२ मे २०२६.

<u>संदर्भ</u> :- शासन निर्णय क्रमांक जीएडी-३३०१८/१५/२०२३-जीएडी (कार्या.१८ए) (७१४५३२)/ रवका-२, दि.३०.०६.२०२५.

<u>**प्रस्तावना.**</u>

सुशासन नियमावली तयार करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सुशानि-२०२२/प्र.क्र.२८/१८अ, दि.२७.०५.२०२२ अन्वये श्री.सुरेश कुमार, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ भा.प्र.से. (सेवानिवृत्त) अधिका-यांची एक समिती घटित करण्यात आली होती. उक्त समितीने आपल्या अहवालात शिफारस केलेल्या महाराष्ट्र सुशासन विधेयकाच्या मसुद्यास अंतिम रूप देण्यासाठी मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव ( प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन ) यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यगट घटित करण्यात आला होता.

सुशासन समितीमार्फत तयार करण्यात आलेला अहवाल ("Manual of Good Governance") शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्यातील मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे विविध विभागांमध्ये सुशासनाची तत्त्वे प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात आहेत. सुशासन कार्यगटाने सुचविलेल्या अनेक शिफारशींची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत आहे. त्यामुळे संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घटित करण्यात आलेला कार्यगट बरखास्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u>

महाराष्ट्र सुशासन विधेयकाच्या मसुद्यास अंतिम रूप देण्यासाठी दि.३०.०६.२०२५ च्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव ( प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन ) यांच्या अध्यक्षतेखाली घटित करण्यात आलेला कार्यगट याद्वारे बरखास्त करण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१२११५९५०१४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK VAMAN JAGADALE

Digitally signed by VIVEK VAMAN JAGADALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=7D00E9EBB180EE84F4D43100AC2EFF6683F136C1EF2C2A29DFEFE3F684583E6F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EABD1BBDEA4937DB9B785FC59EC8B7687F88149B7CC66D8B9FEC89433407C3B0, cn=VIVEK VAMAN JAGADALE
Date: 2026.05.12 12:01:19 +05'30'

**( विवेक जगदाळे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
४. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
५. मा. उपमुख्यमंत्री, नगरविकास यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण,अल्पसंख्याक विकास व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानसभा, विधानभवन, मुंबई. (रिक्त)
९. सर्व मा.संसद सदस्य/विधानपरिषद सदस्य/विधानसभा सदस्य.
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
११.सचिव(विधिविधान), विधि व न्याय विभाग.
१२.महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.
१३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (प्र.ना.,उ. व सुशासन) यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवड नस्ती